# अं | त | रं | ग


| | | | |
|---|---|---|---|
| * | संपादकीय (मनोगत) | | |
| १. | झिंगवत ताल्यावर आणणारी 'सैराट'मधील गाणी आणि संगीत | प्रा. डॉ. शैलेश त्रिभुवन (पुणे) / अंजली ढमाळ (पुणे) | ०२ |
| २. | 'माणूसपण' शोधू पाहणारा 'फॅन्ड्री' | | ०४ |
| ३. | नागराज मंजुळे : लय 'भारी' वक्ता | प्रा. डॉ. जया जितेंद्र कदम (पुणे) | ०६ |
| ४. | नागराज मंजुळे यांच्या 'सैराट' चित्रपटातील सामाजिकता | प्रा. डॉ.अश्विनी आत्माराम तोरणे (मुंबई) | ०९ |
| | | प्रा. डॉ. अनुराधा वसंत गुजर (पुणे) | १७ |
| ५. | 'उन्हाच्या कटाविरुद्ध गुलमोहरासारखी त्वेषानं फुलणारी कविता' | प्रा. डॉ. गणपतराव ढेंबरे (जळगांव) | १९ |
| ६. | सैराट झालं जी.... | | |
| ७. | नागराज मंजुळे : एक चिंतन | प्रा. मनीषा सु. नेसरकर (बेळगांव) | २५ |
| ८. | नागराजचा 'वैकुंठ' ; स्मशानातील सोनं | प्रा. डॉ. मारोती माधवराव घुगे (जालना) | २९ |
| ९. | 'उन्हाच्या कटाविरुद्ध' : सामाजिक वास्तव आणि सौंदर्य | प्रा. डॉ. नाना झगडे (पुणे) | ३४ |
| | | प्रा. डॉ. प्रेरणा विलास उबाळे (पुणे) | ३६ |
| १०. | दिग्दर्शक नागराज मंजुळे यांचे सामाजिक भान | | |
| ११. | 'उन्हाच्या कटाविरुद्ध' – प्रसव वेदनेची व्याकुळता व्यक्त करणारी कविता | प्रा. डॉ. प्रतिभा सुरेश जाधव (नाशिक) | ४१ |
| | | प्रा. डॉ. सागर अशोक पाटील (मिरज) | ४५ |
| १२. | 'फॅन्ड्री' : कथा प्रतिकात्मक संघर्षाची | | |
| १३. | नागराज मंजुळे यांची सशक्त कलाकृती: पिस्तुल्या | प्रा. डॉ. संदीप महादेव उल्हाळकर (पुणे) | ४८ |
| १४. | नागराज मंजुळे यांचा मानवी मूल्यांकरीता खटाटोप | प्रा. डॉ. सर्जेराव वि. पद्माकर (कोल्हापूर) | ५४ |
| | | प्रा. डॉ. सतेज दणाणे (कोल्हापूर) | ५७ |
| १५. | चित्रपट माध्यमाचे भान असणारा दिग्दर्शक: नागराज मंजुळे | प्रा. डॉ. सतीश मस्के (धुळे) | ६० |
| १६. | सबाल्टर्न जाणिवांचा दृकश्राव्य आविष्कार | प्रा. डॉ. शीतल पावसकर भोसले (उल्हासनगर) | ६२ |
| १७. | दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या चित्रपटातील समाजवास्तव | प्रा. डॉ. सुभाष दिनकर आहेर (सातारा) | ७१ |
| १८. | आडवळणीचा वाटसरू 'नागराज' | प्रा. डॉ. संदीप तपासे (अहमदनगर) | ७५ |
| १९. | भिंतीपलीकडचे विश्व: झुंड | प्रा. डॉ. उज्वला यशवंत सामंत (सिंधुदुर्ग) | ७८ |
| २०. | नागराज मंजुळे यांचे चित्रपट : चर्चा आणि चिकित्सा | प्रा. डॉ. केतकी प्रमोद भोसले (पुणे) | ८२ |
| २१. | काळाचा पट उलगडत, अनेक तारा छेडणारा लघुपट– 'तार'. | प्रा. डॉ. उज्वला लक्ष्मण जाधव - भोर (श्रीरामपूर) | ८४ |
| २२. | नागराज मंजुळे : लक्षात राहिलेले विद्यार्थी | प्रा. डॉ. विद्यागौरी टिळक (पुणे) | ८७ |
| २३. | पिस्तुल्या : भारतीय शैक्षणिक विकासात वडार समाजाच्या समाजस्थितीचे प्रतिबिंब | प्रा. डॉ. विशाखा संजय कांबळे (नागपूर) | ८९ |
| २४. | नाळ एक भावस्पर्शी चित्रपट | प्रा. डॉ. शीला दत्तात्रय गाढे (कोपरगाव) | ९२ |
| २५. | 'झुंड'ने अधोरेखित केलेले काही प्रश्न | डॉ. मनोहर जाधव (पुणे) | ९५ |

# नागराजचा 'वैकुंठ' ; स्मशानातील सोनं



प्रा. डॉ. नाना झगडे
प्राध्यापक
अण्णासाहेब मगर महाविद्यालय,
हडपसर, पुणे - ४११०२८
दूरभाष : ९४२२६५२१९७
zagadenana@gmail.com



"समकालीन सामाजिक परिस्थितीवर भाष्य करण्यासाठी वेगळ्या पठडीतील आशय-विषय घेऊन नागराज मंजुळे निर्मिती करतो. जात, धर्म, वर्ग, लिंगभाव जाणिवेतून व्यवस्थेचा वेध घेऊन कलाकृतीची निर्मिती करणाऱ्या कवी मनाच्या नागराजने जळजळीत, धगधगते वास्तव 'वैकुंठ' मधून मांडले आहे. कथा, छायाचित्रण, संगीत, नेपथ्य या सर्व गोष्टींने 'वैकुंठ' सरस झाला आहे. नागराजचा 'वैकुंठ' हा लघुपट 'स्मशानातील सोनं' ठरतो."

कोरोना काळात कोरोनाबाधित मृतांच्या अंत्यसंस्कारासंदर्भातला अतिशय संवेदनशील विषय, हे अंत्यसंस्कार करणाऱ्या माणसांची दयनीय स्थिती नुकत्याच ॲमेझॉन प्राईमवर प्रदर्शित झालेल्या 'अनपॉझ्ड : नया सफर' मधील 'वैकुंठ' या लघुपटात नागराज मंजुळे-सुधीर कुलकर्णी लिखित कथा नागराज मंजुळे यांनी चित्रित केली आहे. या लघुपटात मुख्य भूमिकेत स्वतः नागराज मंजुळे यांनी काम केले आहेत तर सोबतीला अर्जुन करचे व हनुमंत भंडारी यांच्या भूमिका आहेत.


कोरोनानं माणसाला माणसातनं उठवलं अन् मसनवाट्यात बसवलं अशी वाक्य कानावर पडणाऱ्या या काळात स्मशानभूमीत काम करणाऱ्या इक्याला (विकास चव्हाण) घर मालकाने खोली सोडायला भाग पाडल्यावर लहान मुलगा अव्याला (अविनाश) सोबत घेऊन स्मशानभूमीतच राहायला जातो. इक्याचे वडील दादा (तुकाराम चव्हाण) जनहित हॉस्पिटलमधील कोव्हिड वार्डमध्ये ॲडमिट असतात. दादाची घरी येण्याची वाट पाहणाऱ्या बाप लेकाची हृदयाला पिळवटून टाकणारी, मनाला सुन्न करणारी छोटीशी कथा 'वैकुंठ'मध्ये पेटणाऱ्या प्रेतांच्या पार्श्वभूमीवर घडत जाते. प्रेतांच्या रांगा...सरणावरची पेटती प्रेतं... बेसूर रडण्याचा आवाज... चिता रचत असणारी माणसं... स्मशानभूमीतील वास्तव.

कोरोनाच्या महासंकटाच्या काळात होणारे मृत्यू आणि मृतदेहाची विल्हेवाट हा एक प्रश्न निर्माण झाला होता. कोरोना बाधित मृतदेह ताब्यात घेण्यापासून ते मृतदेहाची ओळख पटवणे, अंत्यसंस्कार करण्यापर्यंत असे अनेक जटिल प्रश्न निर्माण झाले होते. दुसऱ्या लाटेत, रुग्णवाहिकांचा आवाज आणि कोविड-१९ ने मरण पावलेल्या रूग्णांच्या बातम्या, अंत्यसंस्काराची दृश्य टीव्हीच्या पडद्यावर दिसत असायची. कोरोनाच्या भीतीने मुलगा वडिलांना अग्नी देऊ शकत नव्हता. नातेवाईकही अस्ति सुध्दा निर्जंतुकिकरण (सॅनिटायजर फवारून) ताब्यात घेत असत. अंत्यसंस्कारालाही जवळची माणसं उपस्थित राहू शकत नाहीत यापेक्षा माणसाची दयनीय अवस्था काय असावी. यातून अनेक सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक असे गुंतागुंतीचे आणि जटील प्रश्न उपस्थित झाले. या भीषण वास्तवाला नागराज मंजुळे यांचा कॅमेरा मोठ्या धाडसाने भिडतो. इथं पत्रांपेक्षा कॅमेरा जास्त बोलतो. आणि आगीत तेल ओतावे तसे पार्श्वभूमीवर येणारे भेसूर रडण्याचे आवाज आणि संगीत प्रसंगाची भीषणता वाढवत जातात. स्मशानभूमीच्या दृश्यांमध्ये पुढे जाणारी ही कथा अतिशय वास्तववादी आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत स्मशानभूमीत येणारे मृतदेह, मृतदेहाची ओळख पटण्यात येणाऱ्या अडचणी, प्रेतांना अग्नी देण्यासाठी आलेले नातेवाईक, नातेवाईकांशिवाय असलेली प्रेतं, कोरोनाच्या भीतीने लांब थांबणारे नातेवाईक, या सगळ्या पार्श्वभूमीवर प्रेतांना अग्नी देणारा कर्मचारी त्याची मानसिकता या सगळ्या दृश्यातून स्मशानभूमीतील भीषणता चित्रित होत जाते. प्रेतांना अग्नि देणाऱ्या विकासाच्या बारीक सारीक हालचाली, त्याची देहबोली, त्याचे विडी पिणे, दारू पिणे, कोरोनाच्या भीतीने घर मालकाने घराबाहेर काढणे, रहायला

खोली मिळत नाही म्हणून लहान मुलाला सोबत घेऊन स्मशानभूमीत राहणे या बाबींचे प्रत्ययकारी रीतीने चित्रित केली आहे.

या लघुपटातील अल्प व प्रत्ययकारी संवाद, पार्श्वभूमीवर रडण्याचे भेदक आवाज, कोरोना पॉझिटिव्ह व मृतांची आकडेवारी सांगणाऱ्या बातम्या, अँबुलन्सचा आवाज, परिणामकारक संगीत दाहकता व भीषणता वाढवणारे आहे. स्मशानभूमीतील राख ट्रेलरमध्ये भरून ती शेतात टाकणाऱ्या शेतकऱ्याचे दृश्य 'आमची माती आमची माणसं'शी नाळ जोडणारा आहे. लघुपटाचा शेवट हा परिणामकारक आहे. लघुपटातील दृश्य आणि ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांनी दिलेले संगीत आशयची गंभीरता वाढवतात. कल्पेशराज कुबल यांनी घेतलेल्या मुलाखतीत नागराज मंजुळे म्हणतात, करोनाच्या पार्श्वभूमीवर काही आशादायी गोष्टी लघुपटांच्या माध्यमातून मांडायच्या आहेत; अशा आशयाची कलाकृती माझ्याकडे आली. मला जमेल का? हे करता येईल का? काय करायचं आहे? यातून मी कोणती गोष्ट सांगू शकेन?; असे काही प्रश्न मनात होते. करोनाच्या संकटातून आपण लवकरात लवकर कसे बाहेर येऊ?; या विचारातच तेव्हा आणि आजही आपण सर्व आहोत. अशा परिस्थिती हा विषय घेऊन लघुपट करावा; हा विचार खरं तर डोक्यातच नव्हता. पण, एका मित्रानं करोनाकाळातील स्मशानभूमीचा एक किस्सा सांगितला आणि त्यातून 'वैकुंठ' लघुपट घडला. सुधीर कुलकर्णी आणि मी ही कथा लिहिली. किरण गाडेकर आणि शेषराज मंजुळे यांनी या लघुपटासाठी वास्तववादी सेट उभारला.




त्यांच्या कलादिग्दर्शनामुळे लघुपट अधिक वास्तववादी झालाय. स्मशानभूमीत चित्रीकरण करत असताना आम्हीदेखील त्या प्रसंगानं दुःखी झालो होतो. कदाचित तेच भाव लाघुपटातही उतरले आहेत. (महाराष्ट्र टाईम्स, २५ जानेवारी २०२२) कोरोनाच्या या महासंकटात माणसाचं जीवन किती क्षणभंगुर, अस्तित्वशून्य, शुद्र असल्याचा प्रत्यय कोरोना काळात संपूर्ण जगाला आला. भीती, असुरक्षा, निराशा, अस्वस्थता, घुसमट यातून अनेकांना जावं लागलं. जीवनाला हीनता प्राप्त झालेली संपूर्ण जगाने पहिली.

आदमी मरने के बाद कुछ नहीं बोलता है
आदमी मरने के बाद कुछ नही सोचता है।
कुछ ना बोलने कुछ ना सोचने से
आदमी मर जाता है। कवी उदय प्रकाश यांच्या या कवितेने अस्मितादर्श साहित्य संमेलनामध्ये अध्यक्षीय भाषणाची सुरुवात करणाऱ्या कवी मनाच्या नागराजची अभिव्यक्त होण्यामागची प्रेरणा या काव्यपंक्तीतून स्पष्ट होते.

हा लघुपटत हिंदी भाषेत असला तरी दृश्यात्मकता ही त्याची खरी भाषा ठरते. दृश्यच या लघुपटात बोलत राहतात. अनेकवेळा देहबोलीच भाषिक काम करते. असे असले तरी या लघुपटातील संवाद विषयाची परीणामकारकता वाढवतात.

पप्पा दादा ठीक होकार घर लौटेंगे ना? हा अविनाशने विचारलेला प्रश्न कोरोना झालेल्या माणूस परत घरी येईल का? नाही ! या बद्दलची शाश्वती वाटत नसल्याची परिस्थिती होती. लहान मुलाच्या या निरागस प्रश्नाला कोणाकडेच उत्तर नव्हते.

डरना नही आ !

दिखाना; हमारी नोकरी देखीना; इसलीए तेरेको बोलता हूँ। मन लगाके पढाई कर! हे ऐकून फक्त मान हालवणारा बालमनाचा अव्या.

क्या ढुंड रहा है? असं म्हणून खिशातला बॉल भिंतीपलीडच्या मुस्लिम मुलाकडे फेकत कल आयेगा क्या खेलने को ? असं विचारणाऱ्या अविनाशच्या चेहऱ्यावरील निरागसता, त्याचं खेळण्या-बागडण्याचं वय तसेच त्याच्या डोळयातील भाव मनाला चटका लावून जातो. महारोगाच्या संकट काळात धार्मीकतेचा अडसर निरागस मुलांना राहत नाही. खेळासाठी एकमेकांना सोबत हवी असल्याचा प्रत्यय येथे येतो.

कोरोना काळात रस्त्यावर चौकशी करण्याऱ्या पोलीस कर्मचारी, इतनी रात कहा घुम रहा था ? असं विचारल्यावर समशान में अंत्यविधिका काम करता हूँ असं सांगितल्यावर, चाय पियेग? हे पोलीस कर्मचाऱ्याचे शब्द आशादायक वाटतात.

सामान्य व्यवहारातील संवादांची भाषा येथे येते. ती वास्तवाची धग आणखी प्रखर करते. नागराजने त्याची कलात्मकता इतर चित्रपटाप्रमाणेच इथेही परिणामकारकतेने वापरलेली पाहायला मिळते. स्मशानभूमीतील वाढत जाणारा राखेचा ढीग अन् भिंतीवरील शंकराचे चित्र, 'एहा

साधन नव्हतीच, पण ती जगण्याचे विलक्षण इंधन देणारी होती आणि आहे आणि म्हणूनच 'माझ्या समानधर्मी मित्राने आत्महत्या केली, मी मात्र कविता केली' असे तो लिहितो तेव्हा कविता नेमका कशाचा पर्याय असते? जगण्याचा की मरण्याचा? असा तिरपागडा प्रश्न तो आपल्या उशाशी ठेवून जातो. नागराज मंजुळे यांना आपल्या पहिल्यावहिल्या 'उन्हाच्या कटाविरुद्ध' ह्या काव्यसंग्रहाला मराठी साहित्य क्षेत्रातला मानाचा दमाणी पुरस्कार मिळाल्यावर डॉ. प्रदीप आवटे त्यांच्यासोबत जेऊरला गेले असताना जेऊरवासीयांनी आणिमंजुळे यांच्यावर प्रचंड प्रेम करणाऱ्या मित्रांनी हलगी-ताशाच्या तालावर त्यांची रेल्वे फाटकापासून त्याच्या घरापर्यंत उत्साहात मिरवणूक काढली होती. त्यात लॉन्ड्रीवाला, चहा टपरीवाला, फिटर, कापड दुकानदार सहभागी होत त्यांना येऊन हार घालत, फेटा बांधत होते, गावातील सानथोर हलगीवर नाचत होते. नागराज यांचीही पावले थिरकत होती. उद्या अनेकांना ज्ञानपीठही मिळेल, पण ही आपल्या माणसांची अशी उत्कट पोचपावती किती जणांना पावेल माहीत नाही. हे भाष्य फार महत्वपूर्ण आहे.

नागराज मंजुळे एका मुलाखतीत म्हणतात की, कविता लिहिण्याची प्रक्रिया ही विहिरीत श्वास रोखून बुडी मारून तळचा दगड आणण्यासारखी, दमछाक करणारी आहे. कादंबरी किंवा अगदी कवितादेखील प्रभावी माध्यम आहे पण कादंबरी किंवा कवितेची एक मर्यादा म्हणजे तिची भाषा. मी मराठीतच कविता करु शकतो. चित्रपट या माध्यमातून मी भाषेच्या मर्यादा ओलांडू शकलो म्हणजे पिफमध्ये शॅले नावाच्या ऑस्ट्रेलियाच्या मुलीनं दोन वेळा फॅन्ड्री पाहिला. बंगलोरच्या थिएटरमध्ये झाडू मारणाऱ्या एका महिलेनं सिनेमा पाहिल्यानंतर मला मिठीच मारली. ती बराच वेळ कन्नडमध्ये काहीतरी बोलत होती. जेव्हा शेजारच्या एका इसमाने मला कन्नड कळत नाही असे तिला सांगितले तेव्हा ती फक्त ब्युटीफुल फिल्म, ब्युटीफुल फिल्म असं म्हणत राहिली. सिनेमा हे वैश्विक माध्यम असल्यानं हे शक्य आहे. याचा अर्थ आपल्या सृजनातून नागराज मंजुळे इथल्या शेवटच्या माणसाच्या मनात घर करतो कारण तो त्याची वेदना, भावविश्व मांडत जातो.

नागराज मंजुळे प्रत्यक्ष कोणत्याही चळवळीचा भाग नसले तरी शाहू-फुले-आंबेडकरांचा वैचारिक वारसा, मानवतावादावरील प्रेम-श्रद्धा त्यांच्या जगण्यातून, चिंतनातून आणि सामाजिक व्यक्तव्यांतून ठळकपणे दिसतात. कधीकाळी उपेक्षेच्या काळोखात नैराश्य आणि संभ्रमात अडकलेले नागराज मंजुळे आज स्वतः 'सक्षम कर्तृत्वाचा एक ब्रँड-आयकॉन बनले आहेत. आपल्या सिनेमातील अनेक पात्रांचा वास्तव आयुष्यातही ते आधार व आशास्थान बनले आहेत म्हणूनच डॉ.प्रदीप आवटे म्हणतात ते सार्थच आहे असे वाटते.

डॉ. आवटे लिहितात,

तुझ्या पारावर बघ किती मंडळी विसावलीत!<br>
नागराज बघ तरी खरं, किती मोठी झालीय तुझी सावली!<br>
तुला भीती होती, जाहिरातीच्या या बोलघेवड्या युगात<br>
कोण ऐकेल माझ्या स्पंदनाची विराणी!<br>
आज तुझी विराणी नव्या युगाचे, नव्या मनूचे गाणे झाले आहे.<br>
तुझ्या प्रकाशाने उजळणाऱ्या पडद्यापुढे सारे डोळ्यांत प्राण आणून बसले आहेत. काळीज काढून ठेव बिनधास्त प्रत्येकाच्या तळहातावर!

---

अमीर और गरीब का बिस्तर एक **पान ४४ वरती पान ३५ वरुन ही होता है ख**' अशी वाक्य, '२०१० वैकुंठ स्मशानभूमी' ही स्मशानभूमीची कमान यावरून कॅमेरा सरकत राहतो. भिंतींना बोलायला भाग पाडत व्यवस्थेच्या भिंतीना हादरे देणे हे नागराजचे वैशिष्ट्ये आहे. 'पिस्तुल्या', 'फँड्री', 'सैराट' मधून पाहायला मिळालेच पण 'झुंड'मध्ये ही अशी बोलकी भिंत दिसते. नागराजसहित इतर कलाकारांचा अभिनय आशयाशी एकरूप होऊन लघुपटाच्या कथेची परिणामकारकता वाढत जाते. कोरोना महामरीत कोविड योद्धा म्हणून अनेकांना गौरविण्यात आले. पण कोरोना बाधित मृतदेहाची विल्हेवाट लावणारे असे कितीतरी योद्धे रात्रंदिवस अक्षरशः खपत होते. अशा अतिसामान्य माणसाला नायकत्व बहाल करणारा नागराज दिग्दर्शक, कलावंत म्हणून येथेही श्रेष्ठच ठरतो. कधी कधी वास्तव सुद्धा कल्पनेपेक्षा काल्पनिक वाटायला लागतं पण ते वास्तव अतिवास्तव असते. या वास्तवाला भिडणारी कलाकृती वैश्विक मानवी मूल्यांना उजागर करत असते.

समकालीन सामाजिक परिस्थितीवर भाष्य करण्यासाठी वेगळ्या पठडीतील आशय-विषय घेऊन नागराज मंजुळे निर्मिती करतो. जात, धर्म, वर्ग, लिंगभाव जाणिवेतून व्यवस्थेचा वेध घेऊन कलाकृतीची निर्मिती करणाऱ्या कवी मनाच्या नागराजने जळजळीत, धगधगते वास्तव 'वैकुंठ' मधून मांडले आहे. कथा, छायाचित्रण, संगीत, नेपथ्य या सर्व गोष्टीने 'वैकुंठ' सरस झाला आहे. नागराजचा 'वैकुं